# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

दूरध्वनी क्र.: ०७२४-२२५८११९ इ-मेल: directorcrs78@gmail.com


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ 1845 /२०२३ दि. 29/ 03/२०२३

### निविदा सूचना

**विषय:- सन २०२३-२४ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत.....**

**संदर्भ:** कुलसचिव कार्यालय जा.क्र.बीईए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४/ दि. २२ जून, २०२१.

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.
३. निविदाधारक/कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. निविदाधारक/कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचे कडे अर्ज करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.
५. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असतांना पिकाचे/फळबागेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
६. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.
७. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
८. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारक/कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

९. निविदाधारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१०. या कार्यालयातर्फे निविदाधारक/कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य/मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही. बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य/मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

११. निविदाधारक/कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१२. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

१३. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१४. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे हि एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कामाचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.

१५. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी निविदाधारक/कंत्राटदाराची असल्याचे रु. १०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित निविदाधारक/कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१६. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **११.०४.२०२३** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | | दर (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | शेतातील काशा/धसकटे/काडीकचरा वेचणे | | प्रति हे. | प्रक्षेत्रावरील पिके -<br>सोयाबीन, कपाशी, मुंग, उडीद, ज्वारी, बाजरी, तूर, बोरू, ढेंचा, करडी, हरभरा, गहू, जवस, मोहरी, एरंडी, सुर्यफुल, तीळ, कराळ व इतर पिके<br><br>प्रक्षेत्रावरील फळबाग -<br>सिताफळ, चिकू, आंबा, निंबू, जांभूळ, पेरू, चिंच, आवळा व इतर फळबाग |
| २ | बियाणे टोकण करणे | जास्त अंतर | प्रति हे. | |
| | | कमी अंतर | प्रति हे. | |
| ३ | विरळणी करणे | जास्त अंतर पीक | प्रति हे. | |
| | | कमी अंतर पीक | प्रति हे. | |
| ४ | पिकातील भेसळ काढणे | | प्रति हे. | |
| ५ | निंदण/खुरपणी करणे | खरीप | प्रति हे. | |
| | | रबी/उन्हाळी | प्रति हे. | |
| ६ | पिकांना/फळबागेला खत देणे | | प्रति हे. | |
| ७ | पिकांना/फळबागेला पाणी देणे | दांड पद्धत | प्रति हे. | |
| | | स्प्रिंकलर | प्रति हे. | |
| ८ | फवारणी करणे | स्प्रे पंप | प्रति हे. | |
| | | पावर स्प्रे पंप | प्रति हे. | |
| ९ | प्रक्षेत्रावरील पिक, फळझाडावर पहारा देणे | | १० हे./दिवस (२४ तास) | |
| १० | कपाशी वेचणी व बोजा भरणे | | प्रति किलो | |
| ११ | पिक काढणी/कापणी, गंजी/बांधणी करणे, मळणी, खळ्यावर जमा करणे | सोयाबिन | प्रति हे. | |
| | | मुंग | प्रति हे. | |
| | | उडीद | प्रति हे. | |
| | | ज्वारी/बाजरी/मका | प्रति हे. | |
| | | तूर | प्रति हे. | |
| | | गहू | प्रति हे. | |
| | | हरभरा | प्रति हे. | |
| | | करडी | प्रति हे. | |
| १२ | पिक काढणी/कापणी, गंजी/बांधणी/गोळा करणे, खळ्यावर जमा करणे, बडविणे, उपणने/झटकणे, | सुर्यफुल, तीळ, जवस, कराळ, बोरू, धैंचा | प्रति हे. | |
| १३ | बैल/गाय चारणे/राखणे, शेण काढणे | १० जनावरे | प्रति दिवस | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता